(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# चंदगड तालुक्यातील ऐतिहासिक किल्ले आणि पर्यटनाच्या संधी

**प्रा .संदीप अशोक पाटील, (साहाय्यक प्राध्यापक)**कला ,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

कोवाड,ता.चंदगड,जि.कोल्हापूर ,MO. No. 7972237454, Email-sandeepapatil20@gmail.com

---

**प्रस्तावना** –

चंदगड तालुका युनोस्कोने जाहीर केलेल्या जगातील १७ अतिसंवेदनशील पैकी भारतातील पश्चिम घाट माथ्यावर वसलेला आहे . पारगड ,कलानिधीगड ,महिपालगड ,गंधर्वगड इत्यादी शिवकालीन ऐतिहासिक किल्ले येथे वसलेले आहेत . हे सर्व किल्ले डोंगरी किल्ले आहेत . या किल्यांचे ऐतिहासिक महत्त्व आणि नैसर्गिक जैवविविधता नटलेला प्रदेश पर्यटकांना भुरळ पाडतो .इब्राहिमपूर ,भोगोली येथील जैन मंदिरे ,निठूर येथील प्राचीन नरसिंहाचे मंदिर अशी विविध धर्मीयांची तीर्थ स्थाने येथे वसलेली आहेत . प्रति महाबळेश्वर म्हणून चंदगड तालुक्याला ओळखले जाते .गोवा ,बेळगाव ,इतर राज्यातून दरवर्षी हजारो पर्यटक चंदगड तालुक्याला भेट देतात .पर्यटनाच्या माध्यमातून चंदगड तालुक्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे .

**प्रस्तुत शोधनिबंधाची उदिष्टे –**

१.चंदगड तालुक्यातील किल्यांचे ऐतिहासिक महत्व स्पष्ट करणे .

२.चंदगड तालुक्यातील किल्ले पर्यटनातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी चर्चा करणे .

३.चंदगड तालुक्यातील किल्याच्या परिसरातील जैवविवधता चे महत्व स्पष्ट करणे .

४. चंदगड तालुक्यातील किल्यांचे जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता स्पष्ट करणे .

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधनासाठी पद्धतीसाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. यासाठी ग्रंथालयीन दुय्यम संदर्भ साधनाचा वापर करण्यात आलेला आहे.तसेच गुगल विकिपीडिया, मुलाखती इत्यादी स्त्रोताद्वारे माहिती संकलित करण्यात आली आहे .

**पारगड ऐतिहासिक महत्त्व –**

पारगड छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाहीकडून इ .स . १६७६ साली जिकून घेतला . हा किल्ला स्वराज्याच्या पार टोकाला वसलेला आहे म्हणून त्याला पारगड म्हणतात .इंग्रज ,पोर्तुगीज ,डच ,फ्रेंच या सागरी शत्रूवर वचक आणि नियंत्रण ठेवण्यासाठी ,पश्चिम किनारपट्टी संरक्षण करण्यासाठी पारगड महत्वाचा होता . देशावरून कोकणात आणि कोकणातून देशावर जाणाऱ्या व्यापाऱ्यांना यामुळे सरक्षण मिळाले . चंद्र ,सूर्य आसतोपर्यंत हा किल्ला अजिंक्य ठेवा असे सांगून तानाजी मालुसरे यांचे पुत्र रायबा मालुसरे ,शेलारमामा याच्याकडे पारगडच्या सरक्षणाची शिवाजी महाराजांनी जबाबदारी दिली .आज त्यांचे११ वे वंशज बाळकृष्ण मालुसरे ही पारगड संरक्षणाची जबाबदारीपार पाडत आहेत .तानाजी मालुसरे यांची तलवार व शिवाजी महाराजा च्या गळयातील समुद्र कवड्याची माळ जतन करून ठेवली आहे . १६८९ साली शहजादा मुअज्जम ,खवासखान या मोघल सरदारांनी पारगड जिंकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला यावेळी झालेल्या लढाईत पारगड वरील तोफखानाचे प्रमुख विठोजी माळवे यांना वीरमरण आले .त्याची समाधी पारगड वर आहे .त्यांचे वंशज कान्होबा माळवे पारगडावर वास्तव्यास आहेत .शेलारमामाचे वंशज कोंडाजी शेलार अस्तित्वात आहेत.

**पारगडावरील प्रमुख ऐतिहासिक ठिकाणे** – पारगड वर जाण्यासाठी एकूण ३६० पायऱ्या चढावे लागते. गडावर जाण्यासाठी दुसऱ्या बाजूने गाडीमार्ग आहे .पारगडावर प्रवेश करताना सर्जा दरवाजा लागतो .

1. भवानी माता मंदिर -पारगडावर भवानी मातेचे भव्य असे मंदिर आहे .भवानी मातेची मूर्ती नेपाळच्या गंडकी शिळेपासून तयार केली आहे .
2. महादेव मंदिर – पारगडाच्या उत्तरेस दरीच्या काठावर महादेव मंदिर आहे .
3. मारुती मंदिर -पारगडावर जाताना सुरुवातीला मारुतीचे मंदिर वसलेले आहे .
4. पारगडाच्या पायथ्याशी वसलेल्या मिरवेल गावात खंडोजी जेधेची पत्नी म्हाळसाबाई त्यांची समाधी आहे .

**पर्यटन आणि रोजगाराच्या संधी** –

गडावर हॉटेल व्यवसायाच्या मध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकते .टुरिस्ट गाईड म्हणून रोजगार उपलब्ध होऊ शकतो .पाऊसाळ्यात रिपरिप पडणारा पाऊस , दाट धुके, डोंगरझाडी हिरवाई ने नटलेली असते .म्हणून या प्रदेशाला प्रति महाबळेश्वर असे देखील म्हटले जाते .

**कलानिधीगड -**

कलानिधीगड हा किल्ला समुद्रसपाटीपासून ३५५४ फूट उंचीवर वसलेला आहे .या गडाचा आकार महादेवाच्या मंदिरातील नंदीसारखा दिसतो म्हणून या गडाला कलानंदिगड असे देखील म्हणतात .पूर्वी हा किल्लाचे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक पु .ल .देशपांडे यांच्या घराण्याकडे या गडाचे वतन होते .या गडाच्या पायथ्याशी कलिवडे हे छोटसे गाव वसलेले आहे . तेथून गडावर जाण्यासाठी जांभ्या दगडाची २ ते ३ कि .मी . वाट आहे . चारचाकी वाहने गडावर जाऊ शकतात . ज्यांना जंगल सफारी करायची आहे त्यांना गडाच्या पायथ्याच्या दुसऱ्या बाजूने दाट झाडीतून पायवाटेने जाता येते .किल्यावर गेल्यावर भव्य असे प्रवेशद्वार आहे . किल्ल्याच्या पूर्वाभिमुख दरवाज्याच्या बाजूला भव्य असे बुरुज आहेत .गडावर शौचकूप आहेत .गडावरती अतिभव्य अशी विहीर आहे . तसेच B.S.N.L. टेलिफोन टावर उभा आहे .गडावर प्राचीन पांडवकालीन गुहा आहेत .एक जुने शिवालय मंदिर आहे.

**ऐतिहासिक महत्व –**

कालानिधीगड या किल्याचा उल्लेख कृष्णाजी अनंत सभासद यांनी लिहलेल्या सभासद बखरीत सापडतो .छत्रपती शिवाजी महाराजांनी गोव्याच्या पोर्तुगीजावर नियंत्रण आणि देखरेख ठेवण्यासाठी हा गड बांधला .पोर्तुगीज कागदपत्रात या किल्याचा उल्लेख सापडतो.

**पर्यटन आणि रोजगाराच्या संधी** –

कलानंदिगडावरून संपूर्ण आसपासच्या डोंगर झाडीचे ,पाण्याच्या तलावाचे मनमोहक दर्शन घडते .या गडावर खानावळ ,हॉटेल तसेच राहण्याची सोय नाही .त्याची सोय केल्यास स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात . तसेच टुरिस्ट गाईड म्हणूनही रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

**महिपालगड –**

महिपालगड हा किल्ला शिवकालीन इतिहासाचा साक्षीदार आहे . तो समुद्रसपाटीपासून ३२२१ फुट उंचीवर आहे .

**गडावरील प्रमुख ठिकाणे** –

या गडावर खोदलेल्या गुहा अप्रतिम आहेत . पुढे बालेकिल्ला व प्रवेशद्वार लागते.प्रवेशद्वारावर गणेश दरवाजा लागतो .महिपालगडाच्या दोन्ही बाजूनी तटबंदी आहे .तसेच खंदक खोदलेले आहेत .गडावर एक मोठी विहीर आहे .त्यामध्ये ३ फुटाचे विवर आहे .विहिरीत उतरण्यासाठी सुबक अशा पायऱ्या आहेत .विहिरीजवळ भवानीमातेचे सुंदर असे मंदिर आहे .मंदिराजवळ टेहळणी बुरुज आहे .

**वैजनाथ मंदिर -**

महिपाल गडाच्या पायथ्याशी देवरवाडी नावाचे गाव वसलेले आहे . तेथून अर्धा चढ चढल्यानंतर प्राचीन असे वैजनाथ मंदिराचे दर्शन घडते .या मंदिराला लागून आरोग्य भवानी मंदिर वसलेले आहे . श्री गुरुचरित्राच्या १४ व्या अध्यायात या तीर्थक्षेत्र चा उल्लेख दक्षिणेतील महाक्षेत्र असा केलेला आहे . मंदिराच्या प्रवेशद्वारावर शिलालेख आहे .मंदिरासमोर सुंदर नंदी आहे .मुख्य गाभाऱ्यातशिवलिंग आहे . वैजनाथ मंदिराला लागून आरोग्य भवानीचे मंदिर आहे .या आरोग्यभवानी मंदिरातील मूर्तीला अष्टभुजा आहेत .वैजनाथ मंदिर आणि आरोग्य भवानी मंदिर हेमाडपंथी शैलीत आहेत.या मंदिरातील खांब आकर्षक व धारदार आहेत .या मंदिराच्या पाठीमागे पवित्र पाण्याचे कुंडाचे दगडी बांधकाम केलेले आहे .

**ऐतिहासिक महत्व -**

हा किल्ला प्राचीन काळात महिपाल नावाच्या राजाने बांधला असे तेथील स्थानिक लोक सांगतात .सभासद बखरीच्या उल्लेखानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी वसवलेल्या १११ किल्ल्याच्या या किल्याचे नाव सापडते .

**पर्यटन आणि रोजगाराच्या संधी-**

महिपालगडाजवळ वसलेले प्राचीन वैजनाथ मंदिर लाखो भाविकांचे श्रद्धा स्थान आहे .दररोज हजारो पर्यटक येथे भेट देतात . येथे हॉटेल व टुरिस्ट गाईड च्या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते .

**गंधर्वगड –**

सभासद बखरीतील माहितीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी वसविलेल्या १११ किल्यांच्या यादीत गंधर्वगड चा उल्लेख सापडतो .गंधर्व गड हा किल्ला समुद्रसपाटीपासून ३२२८ फुट इतका उंच आहे .गंधर्व गडावर जाण्यासाठी चंदगड तालुक्यातील नागनवाडी फाटा मार्गे जावे लागते .पुढे वाळकोळी गावातून गेल्यानंतर अर्ध्या तासानंतर गडावर पोहचतो .गडावर पोहचल्यानंतर आपणास दरवाजाचे अवशेष दिसतात .गडावर चाळोबा देवतेचे मंदिर आहे .तेथे एक नागशिल्प आहे .तसेच दगडी चौथऱ्यावर हनुमंताची मूर्ती आहे .एक पाण्याची विहीर आहे .गडावर ३ चोर दरवाजे आहेत .गंधर्व गडावर हेरेकर सावंत भोसले यांचा एक वाडा होता .परंतु तो नष्ट करून गावकऱ्यांनी शाळेसाठी क्रीडांगण तयार केले आहे .

**गंधर्व गडाचे ऐतिहासिक महत्व –**

शिवाजी महाराज पन्हाळगड घेण्यासाठी १५ जानेवारी १६६६ रोजी गंधर्व गडाच्या परिसरातून पन्हाळगडावर चाल करून गेल्याची माहिती मिळते .कर्नाटक प्रांतातील काकतीचे देसाई व हुकेरी परगण्याचे देसाई यांनी मोघलांच्या वतीने मराठ्याकडून गंधर्वगड घेतल्याचा उल्लेख आहे .त्याबदल्यात काकातीच्या देसाईना बेळगावची तर हुकेरीच्या देसाईना चंदगड व आजऱ्याची देशमुखी व एक हत्ती देण्याचे आमिष मोघलांनी दाखविले होते .पुढे हा किल्ला हेरेकर सावंत भोसले यांच्याकडे होता .पेशवेकाळात सदाशिवराव भाऊ कर्नाटक मोहिमेवर जाताना गंधर्वगडावर काहीकाळ वास्तव्यास होते असा उल्लेख सापडतो .१८४४ साली झालेल्या बंडात इंग्रजांनी या गडाची नासधूस केली .

चंदगड तालुक्यातील जैवविविधता-

युनिस्को ने दुर्मिळ प्राणी आणि वनस्पती आढळणाऱ्या जगातील १८ संवेदनशील प्रदेशाची(HOT SPOT) घोषणा केलेली आहे .त्यापैकी पूर्व आणि पश्चिम घाट या दोन प्रदेशाचा समावेश आहे .हा पश्चिम घाट तामिळनाडू ,केरळ ,कर्नाटक ,गोवा ,महाराष्ट्र याराज्यामध्ये विखुरलेला आहे .त्यापैकी चंदगड तालुक्याचा समावेश पश्चिम घाटाच्या प्रदेशामध्ये होतो . हॉट स्पॉट किंवा जैवविवधतेचे अतिसंवेदनशील प्रदेश म्हणजे त्या भागांत आढळणारे प्राणी ,पशु ,पक्षी ,वनस्पती इतर जगाच्या इतर कुठल्याही प्रदेशामध्ये आढळत नाहीत .

पारगड आणि कलानंदिगड गोवा आणि महाराष्ट्र या दोन राज्यांच्या सीमेवर वसलेला आहे. येथील आसपासचा डोंगर झाडीचा प्रदेश जैवविविधतेचा अतिसंवेदनशील प्रदेश म्हणून ओळखला जातो. येथे प्रतिवर्षी २००० ते ७००० मिलीमीटर पाऊस हा केवळ मान्सून काळात पडतो .या परिसरातील जंगलामध्ये विविध प्रकारच्या औषधी वनस्पती ,गवत,वृक्ष येथे आढळतात .४५०० जातीच्या सपुष्प वनस्पती येथे आढळतात .वाघ ,हत्ती ,अस्वल ,गवा ,सिंह पुच्छ माकड ,निलगिरी वानर ,निलगिरी खार ,निलगिरी पर्वतीय बोकड इत्यादी प्राणी तसेच विविध प्रकारच्या पक्ष्यांच्या जाती येथे आढळतात. परंतु जंगलतोड ,चोरटी शिकार ,खाणकाम ,कुमारी पद्धतीची शेती यामुळे पश्चिम घाटातील जैवविविधता चा मोठ्या प्रमाणांत संपुष्टात येत आहे .अनेक दुर्मिळ औषधी वनस्पतींचे महत्व कळण्याअगोदर मानवाने त्या नष्ट केलेल्या आहेत .दरवर्षी ६० ते ११० चौ .कि .मी .एवढा येथील प्रदेशांतील जंगलांचा ऱ्हास होत आहे . मानवी वस्तीत हत्ती ,वाघ ,बिबट्या ,गवीरेडे हल्ला करीत आहेत. त्यामुळे मानवाच्या जीवास धोका निर्माण झाला आहे . वन्यप्राण्यांच्या हल्यात मानवाचे बळी जात आहेत . शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे .मानवाने हा धोका ओळखून जंगल संपत्तीचे जतन व संरक्षण करणे काळाची गरज बनली आहे .

**निष्कर्ष –**

चंदगड तालुक्याला निसर्गाची मुक्त हस्ते देणगी लाभली आहे. पारगड ,महिपालगड ,गंधर्वगड ,कलानिधीगड इत्यादी ऐतिहासिक किल्ले आणि शिवकालीन इतिहासाने इथली भूमी पावन बनली आहे. पर्यटनाच्या माध्यमातून येथील ऐतिहासिक स्थळांचा विकास झाल्यास स्थानिक तरुणांच्या हाताला रोजगार मिळेल .इतिहास माणसाला जसे खाचखळगे दाखवण्याचे काम करतो तसेच तो व्यवसायाच्या संधी देखील उपलब्ध करून देतो .म्हणून असे म्हटले जाते ,प्रत्येक क्षण हा सोनेरी असतो फक्त ती पारखणारी नजर हवी .'

**संदर्भ साधने –**

१.कोठेकर शांता ,इतिहासाचे तत्व आणि तत्वज्ञान ,साईनाथ प्रकाशन नागपूर ,२०२१

२. चंदगड तालुक्यातील ऐतिहासिक किल्ले व पर्यटनाच्या संधी ,कांबळे अप्पासाहेब धोंडीराम अप्रकाशित शोधनिबंध

३. चिले भगवान ,गडकोट ,शिवस्पर्श प्रकाशन कोल्हापूर ,२००५

४ .पर्यावरण अभ्यास डॉ .प्र .द .राऊत(पर्यावरण शास्त्रविभाग ) , डॉ .विलास द . नांदवडेकर कुलसचिव ,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर ,२०१९

५. www.google.com.wikipedia-tourism in Chandgad taluka fort.